


# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ६ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. १६.०५.२०२४ | अंक नं. ०६४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020










# कापडबाजारात भरदिवसा लाकडी दांडक्याने एकास 'बेदम मारहाण'

नगर – नगर शहराची बाजारपेठ असलेल्या एम.जी. रोडवर लोकसेवा हॉटेलच्या समोर एकाला ५ ते ६ जणांच्या टोळक्याने भरदुपारी अडवून लाकडी दांडक्यांनी बेदम मारहाण केल्याची घटना गुरुवारी (दि.१६) दुपारी घडली. यावेळी या टोळक्याने मालवाहू रिक्षा टेम्पोची ही तोडफोड केली.

प्रशांत काळे उर्फ रॅम्बो (रा. मंगलगेट) असे या हल्ल्यात जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदरचा हल्ला हा जुन्या वादातून झालेला असून मयूर राऊत व त्याच्या साथीदारांनी हा हल्ला केल्याची माहिती जखमी प्रशांत काळे याने पोलिसांना दिली आहे. काळे हा गुरुवारी दुपारी एमजी रोडवर मालवाहू रिक्षा टेम्पो घेवून जात असताना २-३ मोटारसायकल वर ५ ते ६ जण आले. त्यांनी टेम्पो अडवून प्रशांत काळे याला बाहेर ओढले व सर्वजण त्याला लाकडी दांडक्याने मारत सुटले.

### मालवाहू रिक्षा टेम्पोची ही तोडफोड; मारहाणीची घटना सीसीटिव्हीत कैद





त्याला बेदम मारहाण केल्या नंतर २-३ जणांनी हातातील लाकडी दांडक्यांनी मालवाहू रिक्षा टेम्पोच्या काचा फोडल्या, तसेच ठिकठिकाणी दांडक्यांचे घाव घालत तोड फोड केली. त्यानंतर सर्व हल्लेखोर मोटारसायकल वर बसून पसार झाले. घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी प्रशांत काळे याला उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात हलविले. सदर हल्ल्याची घटना परिसरातील दुकानांत असलेल्या सीसीटीव्हीमध्ये कैद झालेली असून पोलिसांनी सदर फुटेज तपासासाठी ताब्यात घेतले आहे.

सदरचा प्रकार हा रविवारी (दि.१२) मंगलगेट येथे झालेल्या मारामारी वरून झालेला असून मयूर राऊत व त्याच्या साथीदारांनी हा हल्ला केल्याचे प्रशांत काळे याने पोलिसांना सांगितले. त्यानुसार पोलिसांनी हल्लेखोरांचा शोध सुरु केला आहे. दुपारी उशिरापर्यंत प्रशांत काळे याचा दवाखान्यात जबाब घेण्याचे काम सुरु होते. त्यानंतर गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# भरदिवसा घर फोडून दागिने व रोकडची चोरी

नगर – कामानिमित्त घराला कुलूप लावून बाहेर गेलेल्या कुटुंबाचे घर भरदिवसा फोडून घरातील पत्र्याच्या पेटीत ठेवलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम, व नवीन साड्या, ड्रेस असा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना नगर तालुक्यातील शिरढोण गावच्या शिवारात बुधवारी (दि.१५) सकाळी ९ ते दुपारी ४ या कालावधीत घडली आहे.

याबाबत जिजाबाई भास्कर रोहकले (रा. शिरढोण, ता. नगर) यांनी सायंकाळी नगर तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी रोहकले यांचे शिरढोण गावच्या शिवारात घर असून त्या बुधवारी (दि.१५) सकाळी ९ च्या सुमारास घराच्या दरवाजाला कुलूप लावून कामानिमित्त बाहेर गेल्या होत्या. दुपारी ४ च्या सुमारास त्या पुन्हा घरी परतल्यावर त्यांना घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला दिसला. त्यांनी घरात जावून पाहणी केली असता घरात सर्वत्र उचकापाचक झाल्याचे दिसून आले.

अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तोडून घरात प्रवेश करत घरातील पत्र्याच्या पेटीत ठेवलेले सोन्याचे दागिने, रोख रक्कम, व नवीन साड्या, ड्रेस असा ४३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. ही माहिती नगर तालुका पोलिसांना कळविण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी जावून पाहणी केली.

याबाबत रोहकले यांनी दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.



### माळीवाड्यात मनपाच्या मालकीच्या सौभाग्य मंगल कार्यालयात जनावरांचा गोठा

माळीवाडा भागातील वॉर्ड क्रमांक १२ मधील ब्राह्मण गल्ली (संत परशुराम गल्ली) भागातील महापालिकेच्या सौभाग्य सदन मंगल कार्यालयाचा अक्षरशः कोंडवाडा झाला आहे तसेच या मंगल कार्यालयाच्या संपूर्ण आवारात अतिक्रमण झालेले आहे. मनपा प्रशासन डोळ्यावर पट्टी बांधून पाहत असून आपल्या मालकीच्या मालमत्ता सांभाळण्यास सक्षम नसल्याचा संदेश नागरिकांमध्ये जात आहे तसेच अनेक गैरप्रकार तेथे राजरोस सुरू असतात, त्यामुळे येथील नागरिक त्रासले आहेत. पण मनपा प्रशासन त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. काही जण आपली जनावरे तेथे बांधतात. हे मंगल कार्यालय अनेक वर्षांपासून बंद आहे. देखभाल दुरुस्ती, नूतनीकरण होत नसल्याने या कार्यालयाचा आता बोजवारा उडाला आहे. मनपाचे शहरातील महाले मंगल कार्यालय, रंगारगल्ली, शिवपवन मंगल कार्यालय नालेगाव, भाग्योदय मंगल कार्यालय केडगाव या मंगल कार्यालयाचेही नूतनीकरण करणे गरजेचे आहे. (छाया – महावीर पोखरणा)
























जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## वाढती अर्थव्यवस्था... आर्थिक असमानता...

भारताचा विकासदर व अर्थव्यवस्था सध्या जगात सर्वोत्तम वाटचाल करीत आहे. एकीकडे करोडपती असणाऱ्यांची संख्या वाढत असली तरी तब्बल ८० कोटी लोकांना दरमहा ५ किलो धान्य मोफत द्यावे लागतेय.

देशात गरीब व श्रीमंतांमधील असमानतेची दरी वाढत चाललीय. अवघा १ टक्का असलेल्या श्रीमंतांकडे देशाची सुमारे ४०% संपत्ती एकवटली आहे. १९९० ला आपण खुली अर्थव्यवस्था, जागतिकीकरण स्वीकारल्यानंतर ही दरी अधिकच वाढत गेली. उपलब्ध आकडेवारीनुसार असमानतेच्याविषयी आपल्या देशातील असमानतेची दरी ही जगात सर्वाधिक आहे. तरुणाईचा देश असलेल्या आपल्या देशाला स्वयंरोजगार, प्रत्येक कामाला हात, शेती व विविध क्षेत्रातील देशी उत्पादनांवर गांभीर्याने लक्ष देऊन कृतीयोजना अंलात आणाव्या लागतील.

वाचनीय मननीय
प्रेरणादायी
अक्षर धन
संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१




आजच्या निवडणुकीच्या राजकारणात वारसा कर, बेरोजगारी मुद्दे आलेत. 'ऑक्सफॅम' इंडियाच्या २०२२ मधील एका अभ्यासानुसार पहिल्या १०० अब्जाधिशांच्या संपत्तीवर केवळ ४% कर लावल्यास या रक्कमेतून पुढील १० वर्षासाठी पोषण आहार, अंगणवाडी, युवांसाठी योजना, राष्ट्रीय क्रेच योजनेचा खर्च भागवता येईल. अर्थात असंही मनात येतं सर्व आजीमाजी राजकारणी, उच्चपदस्थ शासकीय अधिकारी व इतर श्रीमंतांना संपत्ती घोषणा योजना आणली तर ४–५ पंचवार्षिक योजना सामान्यांना कर न लावता पूर्ण करता येतील.

# विक्रम राठोड यांच्यावर दाखल खोटा गुन्हा मागे घेण्यात यावा

## महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचे पोलिस अधिक्षकांना निवेदन

नगर – शिवसेना युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड यांच्यावर दाखल केलेला खोटा गुन्हा मागे घेण्यात यावा, या मागणीचे निवेदन महाविकास आघाडीच्यावतीने जिल्हा पोलिस उपधिक्षक अमोल भारती यांना देण्यात आले. याप्रसंगी शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे शहरप्रमुख संभाजी कदम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर, काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष किरण काळे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, गिरीष जाधव, दिलदारसिंग बीर, प्रमोद वारुळे आदि उपस्थित होते.



युवा सेनेचे राज्य सहसचिव विक्रम राठोड यांच्यावर दाखल केलेला खोटा गुन्हा मागे घेण्यात यावा, या मागणीचे निवेदन महाविकास आघाडीच्यावतीने पोलिस उपअधीक्षक अमोल भारती यांना देण्यात आले. (छाया – बबलू शेख)

निवेदनात म्हटले आहे की, नगर दक्षिण लोकसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी १३ मे रोजी विक्रम राठोड यांच्यावर दाखल करण्यात आलेला खोटा गुन्हा मागे घेण्यात यावा. मतदानाच्या दिवशी महायुतीचे उमेदवाराकडून काही मतदारांना बोटाला शाई लावून पैसे देण्याचा प्रकार सुरु होता. तो महाविकास आघाडीच्यावतीने उधळून लावण्यात आला. याबाबतचे सीसीटीव्ही फुटेजची सर्व तपासणी करुन याची सखोल चौकशी करण्यात यावी व खोटा दाखल गुन्हा मागे घेण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे म्हटले आहे.

यावेळी संभाजी कदम म्हणाले, लोकसभेच्या निवडणुकीत महायुतीचे उमेदवारांच्या कार्यकर्त्यांकडून मतदारांना वेगवेगळे आमिष देण्यात येत होते, काही ठिकाणी पैसे वाटण्याचेही प्रकार झाले. याबाबत महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी यास प्रतिबंध केला. त्यामुळे याचा राग मनात धरुन असे खोटे गुन्हे पदाधिकाऱ्यांवर दाखल केले आहेत. संपूर्ण घटनांचे सीसीटीव्ही फूटेज पोलिसांनी तपासून, सत्य समोर आणावे, अशी मागणी असल्याचे त्यांनी सांगितले.

# उसने दिलेले पैसे मागितल्याच्या रागातून ठेकेदाराला मारहाण

## शिवसेना शिंदे गटाचे संपर्क प्रमुख सचिन जाधवसह चौघांविरूध्द गुन्हा दाखल

नगर – उसने दिलेले पैसे चार लोकांत मागितल्याच्या रागातून शिवसेना शिंदे गटाचे संपर्क प्रमुख माजी नगरसेवक सचिन जाधव व इतरांनी ठेकेदाराला मारहाण केली. चेतन शशीकांत अग्रवाल (वय ३१, रा. बुरूडगाव रस्ता, नगर) असे मारहाण झालेल्या ठेकेदाराचे नाव आहे. मंगलगेट परिसरात सचिन जाधव यांच्या कार्यालयात ही घटना घडली आहे.

मारहाणीत जखमी झालेल्या चेतन यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांनी उपचारादरम्यान पोलिसांना दिलेल्या जबाबावरून सचिन जाधवसह चौघांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात मंगळवारी (दि. १४) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन तुकाराम जाधव (रा. रामचंद्र खुंट), प्रेम काळे, प्रशांत काळे, अभिजित तांबडे (पूर्ण नाव, पत्ता नाही) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. चेतन यांनी सुमारे १५ ते २० दिवसांपूर्वी सचिनला वाळवणे गावातील यात्रेच्या दिवशी उसने पैसे दिले होते.

ते पैसे मागण्यासाठी चेतन हे सचिनच्या मंगलगेट येथील कार्यालयात १२ मे रोजी दुपारी गेले होते. चेतन यांनी पैशाची मागणी केली असता सचिनने शिवीगाळ करून चार लोकांत पैसे मागतो का? असे म्हणून मारहाण केली. धारदार वस्तूने डोक्यात मारून जिवे मारण्याची धमकी दिली. प्रेम, प्रशांत व अभिजित यांनी देखील मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# दाळमंडईतील धोकादायक इमारतीचा भाग कोसळला



दाळमंडईतील जुन्या धोकादायक इमारतीचा एक भाग रात्रीच्यावेळी अचानक कोसळला. (छाया – धनेश कटारिया)

## महापालिकेच्या पथकाकडून उर्वरीत इमारत पाडण्यास सुरुवात

नगर – पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने शहरातील धोकादायक इमारतीवर कारवाई सुरू केली आहे. दरम्यान शहरातील दाळमंडई येथील जुन्या इमारतीचा एक भाग बुधवारी (दि. १५) रात्री अचानक कोसळला. ही घटना कळताच महापालिकेच्या बांधकाम आणि अग्निशामक विभागाने गुरुवारी (दि. १६) संयुक्त कार्यवाही करत सदरची धोकादायक इमारत उतरून घेण्यास सुरुवात केली आहे. दुपारपर्यंत निम्म्याहून अधिक इमारत या पथकाने उतरून घेतली आहे.

सध्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस चालू आहे. तसेच मान्सूनही तोंडावर आला आहे. त्यामुळे शहरातील मान्सूनपूर्व कामांना महापालिकेने सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून धोकादायक इमारतीच्या मालकांना नोटीसा देऊन त्या उतरून घेण्याची सूचना करण्यात आलेली आहे. तथापि दाळमंडईतील नारायणदास मोहनदास बोलद्रा यांची जवळपास ९० वर्षे जुन्या असलेल्या इमारतीचा एक भाग बुधवारी रात्री अचानक कोसळला. त्यामुळे महापालिका प्रशासन खडबडून जागे झाले. प्रशासनाने लागलीच सदरची धोकादायक इमारत उतरून घेण्यास सुरुवात केली आहे. या कारवाईत अग्निशामक विभागाचे शंकर मिसाळ, बांधकाम विभागाचे इंजि. श्रीकांत निंबाळकर यांच्यासह कर्मचारी सहभागी झाले आहेत.

दरम्यान या इमारतीच्या मालकास आणि भाडेकरूंना महापालिकेने नोटीस दिलेली आहे. त्यात म्हटले आहे की, १५ मे रोजी रात्री इमारतीचा उत्तरेचा भाग पडलेला आहे आपली इमारत जी प्लस टू या प्रकारातील व लोड बेरिंग स्वरूपातील आहे त्याचे आयुष्य सुमारे ९० वर्षापेक्षा जास्त आहे तसेच रात्री पडलेला भाग सोडून उर्वरित भाग देखील मोठ्या प्रमाणात कलला आहे त्यामुळे सदर इमारत केव्हाही पडण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर हवामान खात्याने वादळी वाऱ्यासह पाऊस सांगितलेला आहे.पावसामुळे देखील इमारत कोसळण्याची दाट शक्यता आहे यापूर्वी देखील आपणास वेळोवेळी संपर्क केला परंतु आपण येथील स्थानिक रहिवासी नसून आपल्या गावाचा पत्ता मनपाकडे उपलब्ध झालेला नाही. १६ मे रोजी अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त व शहर अभियंता यांच्यासमवेत मनपाचे इतर विभागांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यावेळी आपले प्रतिनिधी नितीन वडोदरा व कांतीलाल वडोदरा यांच्याशी देखील संपर्क केलेला आहे. कधीही पाऊस पडण्याची शक्यता असल्याने इतरांना धोका होऊ नये याकरिता इतर यंत्रणेमार्फत काम करून झालेला खर्च आपल्याकडून वसूल करण्यात येईल.



धोकादायक इमारतीचा उर्वरित भाग खाली उतरून घेताना महापालिकेच्या अग्निशमन विभाग व बांधकाम विभागाचे पथक. (छाया – लहू दळवी)

# पाण्याची पाईपलाइन तोडणाऱ्या ठेकेदाराचे काम महिलांनी पाडले बंद

## रस्त्याच्या कामात ठेकेदाराचा निष्काळजीपणा

नगर – पाणीपुरवठा करणारी पाईपलाइन ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे पुन्हा तुटल्याने पाण्याची गंभीर परिस्थिती ओढवलेल्या रामवाडीतील महिलांनी कराचीवालानगर येथे सुरु असलेल्या रस्त्याचे काम बंद पाडले. पाणीपुरवठा करणारी पाईपलाइन दुरुस्त करा, नंतर रस्त्याचे काम मार्गी लावण्याची मागणी नागरिकांनी केली.



पाण्याची पाईपलाईन तोडणाऱ्या ठेकेदाराचे रस्त्याचे काम रामवाडी येथील महिलांनी बंद पाडले.

कराचीवालानगर येथून रामवाडी भागात पाणी पुरवठा करणारी पाईपलाइन गेली आहे. कराचीवालानगर येथे रस्त्याच्या काँक्रीटीकरणाचे काम सुरु आहे. दोन महिन्यापूर्वी देखील या रस्त्याच्या कामामुळे रामवाडी भागात पाणीपुरवठा करणारी पाण्याची पाईपलाईन तुटली होती. त्यामुळे रामवाडी भागात पिण्याच्या पाण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. आयुक्तांची भेट घेऊन काही दिवसांनी ती पाईपलाइन दुरुस्त करण्यात आली. मात्र पुन्हा दहा–ते बारा दिवसापूर्वी कराचीवालानगरमध्ये पोकलॅण्ड, जेसीबीद्वारे काम सुरु असताना पिण्याच्या पाण्याची पाईपलाइन ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे तुटली असून, नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

संबंधित ठेकेदार व पाणीपुरवठा विभागातील अधिकाऱ्यांना कळवून देखील तुटलेली पाईपलाइन दुरुस्त केली जात नसल्याने नागरिकांनी कराचीवालानगरचे रस्त्याचे काम बंद पाडले. यावेळी विकास उडानशिवे, अनिता मिसाळ, नंदा जाधव, कल्पना मंडलिक, रविना उल्हारे, बिस्मिल्लाह शेख, अनिता पवार, निता उडाणशिवे, माधवी अडागळे, वैशाली साबळे आदींसह महिला उपस्थित होत्या. तातडीने पिण्याच्या पाण्याची पाईपलाइन दुरुस्त करुन नागरिकांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याची मागणी रामवाडी येथील नागरिकांच्या वतीने करण्यात आली आहे.

### महापालिकेचा कारभार कस? तर ठेकेदार म्हणतील तसं

विकासकामासाठी रामवाडीतील नागरिकांचा विरोध नसून, पिण्याच्या पाण्याची गैरसोय करुन निवांतपणे काम सुरु आहे. उन्हाळ्यात रामवाडीतील महिलांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. टँकर घरापर्यंत येत नसल्याने मोठ्या अंतरावरुन डोक्यावर हंडे घेऊन पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. मनपा प्रशासनाने ठेकेदारावर अंकुश ठेऊन चांगल्या पध्दतीने काम करुन घेणे अपेक्षित असताना ठेकेदार मनमानीपणे काम करत असल्याचे विकास उडानशिवे यांनी म्हटले आहे.

# एमआयडीसीतील कंपनीतून हजारो रुपयांच्या धातूची चोरी

नगर – नगरच्या एमआयडीसीतील कंपनीचे गेट रात्रीच्या वेळी उघडून मागील बाजूचा पत्रा उचकटून अज्ञात चोरट्याने ६० हजार रुपये किमतीच्या शिसे या धातूच्या लाद्या चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.१४) सायंकाळी ६.३० ते बुधवारी (दि.१५) सकाळी ८.३० या कालावधीत घडली आहे.

याबाबत भारत इंडस्ट्रीज या कंपनीचे व्यवस्थापक राधाकृष्ण मधुकर चव्हाण (रा. तपोवन रोड, नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. भारत इंडस्ट्रीज या कंपनीचे व्यवस्थापक व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.१४) सायंकाळी ६.३० च्या सुमारास कंपनीच्या गेटला कुलूप लावून ते घरी गेले होते. बुधवारी (दि.१५) सकाळी ८.३० च्या सुमारास ते पुन्हा आले असता कंपनीचे गेट उघडे दिसले. तसेच शेडचा पत्रा उचकटलेला दिसला.अज्ञात चोरट्याने शेडमध्ये ठेवलेल्या शिसे या धातूच्या लाद्या चोरून नेल्या असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.दं.वि. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

## बाजारपेठेतून मोटारसायकलची चोरी

नगर – शहरातील बाजार पेठेत सारडा गल्ली येथे एका दुकानासमोर लावलेली हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटारसायकल (क्रं.एम. एच.१६ ए यु ५४९४) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.

याबाबत शिवाजी ज्ञानोबा पतंगे (रा. अमित नगर, कल्याण रोड) यांनी बुधवारी (दि.१५) कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## वाडिया पार्क येथून मोटारसायकलची चोरी

नगर – शहरातील वाडिया पार्क क्रीडा संकुलाच्या पार्किंग मध्ये टिळक रोडच्या बाजूला लावलेली हिरो कंपनीची पॅशन प्लस मोटारसायकल (क्रं.एम.एच.१६ ए जी ९३०६) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना मंगळवारी (दि.१४) दुपारी ४.३० ते सायंकाळी ७.५० या कालावधीत घडली आहे. याबाबत प्रशांत दिगंबर होडशिळ (रा. औसरकर मळा, सारसनगर) यांने बुधवारी (दि.१५) कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.दं. वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## संजय शाह यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बालिकाश्रमरोडवरील सावेडीच्या कवडेनगरमध्ये राहणारे व कापड बाजार येथील सकिना कलेक्शनचे संचालक संजय रतिलाल शाह (वय ६७) यांचे १६ मे रोजी ८ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, २ भाऊ, भाऊजया असा परिवार आहे. कापड बाजार येथील प्लेझर रेडिमेडस्चे मिलिंद शाह यांचे मोठे बंधू होत.

## भगवान निमोणकर यांचे अल्प आजाराने निधन



नगर – निंबळक येथील खंडोबा मंदिराचे सेवेकरी भक्त भगवान शंकर निमोणकर (पुजारी, वय ६०) यांचे १६ मे रोजी सकाळी ६ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर निंबळकच्या देवनदीतिरी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## तारकपूर बसस्थानकातून मोटारसायकलची चोरी

नगर – शहरातील तारकपूर बसस्थानकाच्या आवारात उभी केलेली हिरो कंपनीची सी डी डिलक्स मोटारसायकल (क्रं.एम. एच.१६ ए एक्स ८७७७) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे.

याबाबत विकास सदाशिव वाल्हेकर (रा. रामवाडी) यांनी बुधवारी (दि.१५) तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. वाल्हेकर हे शनिवारी (दि.११) रात्री ९.३० च्या सुमारास तारकपूर बसस्थानकात गेले होते. तेथे स्वच्छता गृहासमोर त्यांनी मोटारसायकल उभी केली व ते लघुशंकेसाठी स्वच्छता गृहात गेले असता अज्ञात चोरट्याने त्यांची मोटारसायकल चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भा.दं.वि.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# तंत्रशिक्षण संचालनालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२४–२५ अभियांत्रिकी पदविका प्रवेशासाठी कागदपत्रांची यादी जाहीर

नगर– मे महिना संपत आला की नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असल्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची लगबग सुरू होते. हेच लक्षात घेऊन तंत्रशिक्षण संचालनालयाने नवीन शैक्षणिक वर्षांमध्ये अभियांत्रिकी पदविका प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दहावीच्या निकालाची वाट न पाहता प्रवेशासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची यादी जाहीर केली आहे. यामुळे कागदपत्रांची जुळवाजुळव करणे यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सुरु होण्यापूर्वी पुरेसा वेळ मिळणार असल्याने विद्यार्थ्यांनी या वेळेचा सदुपयोग करत आवश्यक त्या कागदपत्रांची जमवाजमव करावी, असे आवाहन तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी केले आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या आधिपत्याखालील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका (Polytechnic) अभ्यासक्रमाचे प्रवेश लवकरच केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे सुरु करण्यात येणार आहेत. यासाठी लागणाऱ्या सर्व प्रमाणपत्रांची यादी संचालनालयाकडून देण्यात आली असून ही कागदपत्रे तयार ठेवून विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन डॉ. जी. व्ही. गर्जे, सह. (संचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय नाशिक) यांनी केले आहे. यासंदर्भातील अधिक माहिती संचालनालयाच्या https://dte.maharashtra.gov.in/ या संकेत स्थळावर देण्यात आली असून अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संकेतस्थळाला भेट द्यावी व त्यासंदर्भात माहिती मिळवावी. तसेच प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष पदविका अभ्यासक्रम (Polytechnic) प्रवेश प्रक्रियेसाठी शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर येथे समुपदेशन कक्ष कार्यरत असून प्रवेश प्रक्रिये संबंधित अधिक माहितीसाठी एस. जी. बडेकर व ए. जी. जोशी प्रवेश प्रक्रिया अधिकारी यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य बी.एम. कर्डिले यांनी केले आहे.

प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रांची यादी पुढील प्रमाणे:– जात/जमात प्रमाणपत्र (caste/tribe certificate) (महाराष्ट्रातील सक्षम प्राधिकारी यांनी विहित प्रपत्रात निर्गमित केलेले)

अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती (SC/ST) व्यतिरिक्त उर्वरित सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत वैध).

राष्ट्रीयत्व (Nationality) व अधिवास प्रमाणपत्र (domicile certificate), उत्पन्नाचे प्रमाणपत्र (income certificate) (दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंत वैध).

आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) प्रवर्गासाठी प्रमाणपत्र– महाराष्ट्र राज्याच्या शासन निर्णयास अनुसरून विहित केलेल्या प्रपत्रात सक्षम प्रधीकार्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करिता वैध.

दिव्यांग बाबतचे प्रमाणपत्र (person with disability) – आवश्यकतेनुसार.

सैन्यदलातील संवर्गातून प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांच्या प्रवेशासाठी माहितीपुस्तिकेत दिलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र

अल्पसंख्यांकांसाठी प्रवर्गासाठीचे प्रमाणपत्र (minority certificate)आधार क्रमांक व संलग्न बँक खाते– शिष्यवृत्ती व इतर योजनांची रक्कम थेट लाभार्थीच्या खात्यात जमा होण्यासाठी आवश्यक.

# गृहिणी

## आरोग्य

### व्यायाम करणे केव्हा टाळावे

आपण नियमीत व्यायाम करणे आरोग्यासाठी चांगले आहे यात वादच नाही परंतु काही अपरिहार्य कारणांनी व्यायाम न करणेच योग्य असते. उदा. आपण आजारी असाल तेव्हा, नशा केलेली असेल तेव्हा, भूक, झोप आदी कारणांमुळे शरीरात अशक्तपणा असेल तेव्हा, भोजन केल्यानंतर ५ तास होण्यापुर्वी, अतिशय भूक किंवा तहान लागलेल्या स्थितीत, मन संतप्त असेल तेव्हा, स्त्रियांनी मासिक पाळी सुरू असताना. आदी कारणे असतील तर व्यायाम न करणेच चांगले.

## पाककला

### हरभरे पॅटीस

**साहित्य** – ३ पेले उकडलेले हरभरे, १ मोठा कांदा, ३–४ हिरव्या मिरच्या, थोडीशी कोथिंबीर, २ ब्रेड स्लाईस, अर्धा लहान चमचा मीठ, अर्धा लहान चमचा मसाला, तळण्यासाठी पुरेसे तेल, मैद्याचे मिश्रण.

**कृति** – कांदा बारीक चिरून घ्या. हरभरे पाट्यावर वाटून घेऊन त्यात कांदा, कोथिंबीर, चिरलेल्या मिरच्या, लाल मसाला व मीठ मिसळा.

ब्रेड भिजवून हाताने पिळून तो लगदा त्यात मिसळून मळा. मनाजोग्या आकाराचे कटलेट तयार करा. मैद्याच्या मिश्रणात बुडवून गरम तेलात तळून सलादासोबत खाण्यास द्या.

## सल्ला

### फर्निचर वरील डागांसाठी

✻ जर फर्निचरवर डाग पडले असतील तर पॉलिश करण्याच्या सुमारे चोवीस तास आधी त्यावर कॉडलिव्हर ऑईल लावावे.

✻ जर आपल्या तोंडाचा वास येत असेल तर प्रथम ३–४ ग्लास पाणी घ्यावे. हळूहळू वास कमी होईल; परंतु पोटही साफ ठेवावे.

## सौंदर्य

दह्यामध्ये काकडी किसून ते चेहऱ्यावर लावा. यामुळे सनटैन दूर होतो व त्वचा मुलायम होते.

## वास्तू

नळाची किंवा पाईपची गळती ताबडतोब बंद करा. अन्यथा तुमच्या बँक बॅलन्सला गळती लागेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १७ मे २०२४

---, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, पूर्वा २१।१८

सूर्योदय ०६ वा. २५ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.

**राशिभविष्य–**

**मेष** : सर्जनशील कार्यांमध्ये शिस्त असल्यास उन्नतीचा मार्ग मोकळा होईल. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. अधिक खर्च होईल. व्यावसायिक संबंधांमध्ये ताण पडू शकतो.

**वृषभ** : अधिकार क्षेत्रात वाढ होईल. मुलांसाठी आणि पत्नीसाठी जास्त वेळ काढणे आवश्यक आहे. आजचा दिवस आपल्या करियरवर विधायक परिणाम घडवू शकतो. आजचा दिवस विधायक कामासाठी चांगला आहे.

**मिथुन** : आनंदाची बातमी मिळेल. मानसन्मानात वाढ होईल. व्यापार–व्यवसायात उत्तम स्थिती राहील. वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटण्याची किंवा एखादे महत्त्वाच्या नवीन प्रोजेक्ट आरंभ करण्याची योग्य वेळ आता आली आहे.

**कर्क** : तीव्र वेगाने टाकलेली पावले आपणास प्रतिस्पर्ध्याकडे ओढतील. भागीदारीच्या कामांमध्ये सावध राहा. आपल्या कार्यस्थानावर सहकाऱ्यां बरोबर वाद करणे टाळा.

**सिंह** : महत्वाची बातमी मिळाल्याने आनंदित राहाल. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास मिळेल. आजचा दिवस छान जाईल. मैत्रिण किंवा प्रेयसी भेटेल. आपल्या जोडीदाराबरोबर उत्तम वेळ व्यतीत

**कन्या** : अनुकूल ते सहकार्य मिळेल. वेळेचे सदुपयोग केल्याने लाभ मिळेल. मनोरंजनासाठी वेळ काढाल. कार्यक्षेत्रात वेगाने कार्य करा. वाहने व उपकरणे जपून चालवावीत.

**तूळ** : कामात व्यस्तता अधिक असल्यामुळे आरोग्यावर विपरीत प्रभाव पडेल. एखाद्या कल्पक, सर्जनशील कार्यात गुंतलेले राहू शकता. आपण एखाद्या व्यक्तीपासून प्रेरीत व्हाल. पत्नी व मुले यांचा आनंददायी सहवास लाभेल.

**वृश्चिक** : अधिक व्यग्र राहील. वाहने काळजीपूर्वक चालवा. चिंता करणे टाळा. आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्या. आरोग्य नरम–गरम राहील. नोकरदार मंडळीनो काळजीपूर्वक काम करा. मुले त्रास देऊ शकतात.

**धनु** : कामासाठी प्रवासाचे योग संभवतात. शत्रू वर्गाचे डावपेच वाया जातील. वाहनसुख मिळेल. उत्तम भोजनाचे सुख मिळेल. मित्रांपासून आनंद मिळेल. भागीदारीच्या विषयांमध्ये सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.


**मकर** : आरोग्याची काळजी घ्या. आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. दिवस आनंदात जाईल. एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित रहाल. पैसे मिळवण्यासाठी आजचा दिवस उत्तम आहे.

**कुंभ** : कौटुंबिक वेळ अनुकूल राहील. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. शत्रूंपासून सावध राहा. मनोरंजनावर खर्च होईल. पत्नीपासून उत्तम सुख मिळेल. आर्थिक विषयांमध्ये देवाण–घेवाण टाळा. प्रेमसंबंधात यश मिळेल.

**मीन** : आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगा. प्रत्येक व्यक्तीशी मृदू आणि सौम्य वागण्याचा प्रयत्न करा. अपत्यांपासून आनंदप्राप्ती होईल.आकस्मिक संधी मिळेल. संवाद कायम ठेवण्याचा प्रयत्न करा. काळजीपूर्वक कार्य करा. पळापळ अधिक राहील. आरोग्याची काळजी घ्या.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## फिल्मीचक्कर क्र. ११३८ सौ. शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :–** १) शाहरूखखान, माधुरी दीक्षित, अमरीश पुरी, हिमानी शिवपुरी, जॉनी लिव्हर, सलीम घोष यांचा एक चित्रपट ३) आदित्य +++ (अभिनेता) ४) सुरुवातीच्या काळातील शाहरूखखानचा एक चित्रपट ५) राजेश खन्ना, शबाना आझमी, सचिन, पिंचू कपूर, गुलशन ग्रोव्हर, ए. के. हंगल यांचा एक चित्रपट ७) ++ इन टोकियो (चित्रपटाचे नाव) ८) ++ कपूर (दिवंगत अभिनेता) ९) अजय देवगण, जुही चावला, नसिरुद्दीन शहा, रिमा यांचा एक चित्रपट ११) अमिताभ बच्चन, नितू सिंग, अमजदखान यांचा एक गाजलेला चित्रपट १३) एक ++ ++ भानगडी (मराठी चित्रपटाचे नाव) १५) प्यासा +++ (चित्रपटाचे नाव) १६) विश्वजीत, माला सिन्हा यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :–** १) हृतिक रोशन, प्रीती झिंटा, रेखा यांचा एक चित्रपट २) अनिल कपूर, श्रीदेवी, रवीना टंडन, अनुपम खेर, फरिदा जलाल यांचा एक चित्रपट ३) अक्षयकुमार, नंदिनी यांचा एक ५) +++ देवगण (अभिनेता) चित्रपट ६) धर्मेंद्र, लीना चंदावरकर, जगदीप यांचा एक चित्रपट ८) ++ हिन्दुस्तानी (चित्रपटाचे नाव) ९) ना ना करते प्यार तुम्हीसे कर बैठे (गाणे) १०) राज बब्बर, झरिना वहाब यांचा एक चित्रपट १२) 'राम तेरी गंगा मैली' चित्रपटाचा नायक – +++ कपूर १४) ++ बलराम (चित्रपटाचे नाव)

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : अन्यायाशी तडजोड करणे हे सर्वांत मोठे पाप आहे. – **सुभाषचंद्र बोस.**

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### पाठदुखीवर काय उपचार घ्यावे?

पाठदुखीला अस्थिव्यंगोपचार तज्ज्ञाची रोजीरोटी असे गंमतीने म्हटले जाते! याचा अर्थ एवढाच की पाठदुखीवर उपचार घेत राहावे लागतात. शाहरूख खान, सचिन तेंडुलकर यांच्या पाठदुखीमुळे सर्वांना पाठदुखीविषयी जास्त माहिती झाली. पाठीच्या कण्याला दुखापतींमुळे वा आजारांमुळे पाठ दुखते. पाठीचे स्नायू दुखावले तरीही पाठ दुखते. विचित्र अवस्थांमध्ये अवघडलेल्या स्थितीत काम करणे, मणक्यांच्या हालचालींचा अभाव, मणक्यांच्या पृष्ठभागावर खडबडीतपणा येणे, दोन मणक्यांमधील कुर्चा सरकून मज्जारज्जूवर दाब येणे, तसेच मणक्यांमध्ये अतिरिक्त हाडाची वाढ होणे या सर्वांमुळे पाठ दुखू शकते. काही वेळा नसा दाबल्या गेल्याने मुंग्या येणे, बधीरपणा येणे अशी लक्षणेही दिसून येतात.

पाठदुखी झाल्यास वेदनाशामके घेणे हा वरवर सोपा पण तात्पुरता परिणाम करणारा उपाय होय. पाठदुखी टाळण्यासाठी उभे राहताना, बसताना, काम करताना शरीराची अवस्था सुयोग्य राहील हे पाहायला हवे. सामान्यतः दिवसभरात अनेकवेळा आपण समोर झुकतो किंवा वाकतो. त्यामुळे पाठ दुखायला लागते. अशावेळी पाठीच्या कण्याला विरुद्ध दिशेने ताण देणारी भुजंगासन, नौकासन अशी आसने नक्कीच फायदेशीर ठरतात. पाठीच्या कण्यासाठीचे अनेक व्यायाम आहेत. पाठ दुखत असताना हे व्यायाम करू नयेत. पाठीचे व्यायाम हा पाठदुखी टाळण्याचा प्रभावी व कायमस्वरूपी इलाज आहे. मणक्यात रचनात्मक बिघाड झाला असेल तर क्वचित पाठदुखी बरी करण्यासाठी शस्त्रक्रियाही करावी लागते.

## ससाण्याचा आगाऊपणा

एका झाडावर बसून पोपट विश्रांती घेत असता एक ससाणा शेजारच्या फांदीवर येऊन बसला आणि पोपटाची विचारपूस करू लागला. तो पोपटाला म्हणाला,

''अरे पोपटभाऊ, तुझी चोच इतकी मजबूत आणि तीक्ष्ण असताना तू नुसती फळेच खाऊन कसा काय राहतोस?'' ससाणा असे म्हणताच पोपट म्हणाला,

'' कशाला नसत्या चौकशा करतोस? माझी चोच मजबूत असली, तरी दुसऱ्याचा जीव घेऊन पोट भरावे, असे माझ्या आई–वडिलांनी मला शिकविले नाही.''

पोपटाने असे फटकारताच ससाणा मनात म्हणाला, ''फार गमजा करतोस ना? कधीतरी तुझाच फडशा पाडतो.'' असे म्हणत ससाणा दूर गेला. इकडे पोपटाने झाडावरील चार–दोन फळे खाल्ली आणि थोडा वेळ विश्रांती घेऊन तो आपल्या घराकडे परतू लागला असता एका कोंबड्याच्या खुराड्याजवळ ससाण्याला ठार मारून कोंबड्याच्या मालकाने झाडाला उलटे टांगून ठेवले होते. ते पाहताच पोपट मनात म्हणाला,

''दुसऱ्याचा जीव घेऊन त्याच्या मांसावर मजा मारणारांची या ससाण्यासारखीच गत होते.''

**तात्पर्य** : वाईट कृत्ये केली असता स्वतःवरही वाईट प्रसंग येतात.

## जीवन चक्र



इसी मानव चोले में हम प्रभु को पा सकते हैं, उससे एकमेक हो सकते हैं। आगे फ़रमा रहे हैं :

**जो ब्रहमंडे सोई पिंडे जो खोजै सो पावै ।।**

जो ब्रह्मंड में है वही पिंड में है। 'Macrocosm is in the Microcosm,' जो भी हम ब्रह्मंड में पाते हैं, वह इस पिंड में मौजूद है। सारे खंड–ब्रह्मड हमारे अन्दर मौजूद हैं। जो इन्हें खोजेगा वही इन्हें पाएगा। आगे फरमा रहै है –

**पीपा प्रणवै परम ततु है सतिगुरु होइ लखावै ।।**

गुरुग्रंथ साहिब पृ. ६९५

पीपा जी महाराज फ़रमा रहे हैं कि परम तत्व शब्द है, जिसे कलमा कहा गया है, Holy Word कहा गया है, Voice of Silence कहा गया है। उसको मैं नमस्कार करता हूँ।

**सतिगुरु होइ लखावै ।।**

– गुरुग्रंथ साहिब पृ. ६९५

सत्गुरु के ज़रिये ही मैं उसके दर्शन कर सकता हूँ, उसका अनुभव कर सकता हूँ, उसके साथ जुड़ सकता हूँ। राजा पीपा जी महाराज हमें यही समझा रहे हैं कि इस शरीर में आने का ध्येय यह है कि हम प्रभु से जुड़ें, उससे एकमेक हों। मानव चोला सृष्टि में सबसे उत्तम योनि है।

इस चोले में आने का मक़सद तभी पूरा होगा जब सत्गुरु के ज़रिये हमारी अंदरूनी आँख खुलेगी। जब किसी सत्गुरु की दया–मेहर हम पर होती है, तो वे हमें प्रभु के शब्द का अनुभव करा देते हैं। वह शब्द जो कण–कण में रमा हुआ है, हमारे भीतर भी गूंज रहा है। शब्द को हम अंतर्मुख होकर सुन सकते हैं और उसके साथ जुड़ सकते हैं। गुरु की महिमा बहुत से महापुरुषों ने की है। स्वामी जी महाराज ने फ़रमाया है :

**गुरु सोई जो शब्द सनेही । शब्द बिना दूसर नहिं कोई ।।**

सत्गुरु वही है, जो हमें अंतर में शब्द को सुना सके। जब तक हम शब्द से नहीं जुड़ेंगे, हमारी कोई और मदद नहीं कर सकेगा, हमारा दुनिया में आने का मकसद पूरा नहीं होगा। इस शब्द में राजा पीपा जी महाराज हमें यही समझा रहे हैं कि इस शरीर में आने का बहुत बड़ा राज़ है।

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

झूम रहे हैं... नाच रहे हैं, लहरा रहे हैं... तन–मन में प्रसन्नता की लहर हो... सन्तुष्टता के वायब्रेशन हों... क्योंकि हमारी खुशी के प्रभाव से पौधे अच्छी तरह से बढ़ेंगे... उनमें चमक आयेगी... हमारी खेती... सुजलाम् सुफलाम् होगी...।

**अनाज में दूध भरने के समय** – ऊपर की विधि के साथ, अनाज में दूध भरने का समय जब होता है तब मास्टर सुखदाता बन सुख के सागर परमात्मा से सुख की, खुशी की, प्रेम की किरणें फसल में प्रवाहित करें...। संकल्प करें कि यह अनाज परमात्मा की शक्तियों से बहुत ही सात्विक और पौष्टिक बन रहा है...। अनाज सही समय पर एक साथ तैयार हो रहा है... । परमात्मा की शक्तियों से इतना शक्तिशाली बन रहा है जो खाने वालों का तन और मन निरोगी और शक्तिशाली बनेगा...। अनाज को निकालने के समय पौधों से स्पर्श करते हुए धन्यवाद करना है। प्रकृति के पाँचों तत्व और परमात्मा को धन्यवाद करते फिर अनाज को निकालना है। यह योग विधि सर्व प्रकार के फसल के लिए है। गन्ने जैसे फसल में उपरोक्त योग की विधि के साथ टनेज़ और शुगर की मात्रा बढ़ने में भी हम संकल्प कर सकते हैं जैसे एक एकड़ खेती में ८० टन गन्ने का वज़न होगा और शुगर की मात्रा १२ परसेन्ट रहेगी।

गन्ने की वैराइटी अनुसार १२ से १५ मास में टनेज और शुगर पर्सेन्टेज अच्छी मिल रही है... ऐसा संकल्प करें।

केले की फसल में भी ऊपर की योग की विधि से रोज १० मिनट एकाग्रता के साथ योगदान करना है।

केले के पौधे लगाने के ४ मास बाद रोज़ १० मिनट परमात्मा के शक्तियों को प्रवाहित करते संकल्प करें कि सभी पौधों में एक साथ सूक्ष्म केले का निर्माण (गर्भधारण) हो रहा है... । **ब) वीज संस्कार के लिए योग विधि :–** जो बीज आपको खेत में बुआई करने हैं उन पर योग का प्रयोग करना है, उस बीज को सामने रखें। अगर वह बीज जैसेकि गन्ना, अदरक, आलू आदि बड़ी मात्रा में होते हैं तो बुद्धि के नेत्र से बीज को देखना है, स्वयं को मास्टर बीजरूप के स्वमान में स्थित कर परमात्मा से शक्तियों की अनुभूति करते हुए बीज के अंकुर पर उन परमात्म किरणों को प्रवाहित करें.... और संकल्प करें कि यह बीज के उगने की क्षमता बढ़ा रही हैं...। संकल्पों से ही बीज के बाहर जो कवच होता है उसे परमात्मा की पवित्र किरणों से लपेटना है...। जिससे बीज की कीट और फफूंदीजन्य रोगों से सुरक्षा हो... । बीज के अन्दर शक्तियों की किरणें भरकर बीज को संकल्प देना है कि आपको निरोगी और शक्तिशाली पौधों का निर्माण करना है... । यही संकल्पों का प्रयोग हम वतन में भी कर सकते हैं। इस योगाभ्यास में जब मन पूरा एकाग्र हो जाता है तब १० मिनट तक योगदान देना है।

जो बीज बुआई करने हैं... रोज़ पहले एक सप्ताह के लिए योगकक्ष में रख दें... बीज संस्कार विधि... विशेष अमृतवेले की जाती है...

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

एकदा नवरा बायको डिस्कव्हरी बघत असतात


चॅनेलवर म्हैस दिसते

नवरा : ती बघ तुझी नातेवाईक

बायको : अय्या...सासुबाई!

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)



माझी आता जायची वेळ झालीय
आणि वारा आता
संगिताच्या बडबडीमध्ये
सामील होतोय

**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

लग्नानंतर लगेच गर्भधारणा झाली तर भावी मातापित्यांची बाळाचे संगोपन करण्याची मानसिक तयारी होत नाही व अशा वेळी नवविवाहित दांपत्य गर्भपात करुन घेतात. पहिल्या प्रसूतीनंतर काही जणींना लगेच काही महिन्यांत गर्भधारणा होते. पहिले बाळ लहान असल्याने अनेकदा गर्भपात करुन घेतला जातो. या गर्भपाताचे स्त्रीच्या शरीरावर वाईट परिणाम दिसू शकतात. बाळ कधी हवे, त्याच्या संगोपनाची शारीरिक व मानसिक तयारी आहे का? याचा विचार करुनच गर्भधारणा राहू द्यावी; तसेच दोन अपत्यांमध्ये किती अंतर ठेवावे, याचे नियोजन करावे. पहिल्या प्रसूतीमध्ये स्त्रीला आलेला अशक्तपणा, शरीराची झीज भरुन आल्यानंतर, म्हणजेच साधारणत: तीन वर्षांनी दुसरे अपत्य होऊ द्यावे. हे नियोजन व्यवस्थित पार पडण्यासाठी संततिप्रतिबंधक उपाय माहीत असणे गरजेचे आहे. ती माहिती आपण आता घेऊयात.

**स्त्रियांनी वापरावयाची साधने –**

**१) गर्भनिरोधक गोळ्या :** या गोळ्या पाळीच्या पाचव्या दिवशी सुरू कराव्यात. एकदा गोळी सुरू केली की, ती मध्येच बंद करू नये. नाहीतर लगेच पाळी येते. नियमितपणे रोज रात्री एक गोळी घ्यावी. एखाद्या वेळेस चुकल्यास दुसऱ्या दिवशी सकाळी एक व रात्री एक अशा दोन गोळ्या घ्याव्यात. नवविवाहितांसाठी हे सर्वांत सोपे साधन आहे. अगदी कमी मात्रेत हार्मोन्सचा डोस असलेल्या गोळ्या बाजारामध्ये उपलब्ध आहेत. फक्त आपल्या डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखालीच त्या सुरू कराव्यात. काहींना गोळ्या सुरू केल्यानंतर चक्कर येणे, डोके दुखणे, मळमळ अशा स्वरूपाचा त्रास होऊ शकतो. सुरुवातीला प्रथमत: रोज कपभर दूध प्यावे व नंतर गोळी घ्यावी म्हणजे कमी त्रास होईल. या गोळ्या जास्तीत जास्त सहा महिने खाव्यात. मध्ये एक महिना गोळ्या बंद करून पुन्हा सुरू केल्या तरी चालतात.

**२) नैसर्गिक संततिप्रतिबंधक उपाय :** साधारणत: पाळीच्या दहाव्या दिवसापासून ते विसाव्या दिवसापर्यंत गर्भधारणा होत असते. त्यामुळे या काळात संबंध होऊ देऊ नये. पाळीच्या पाचव्या दिवसापासून पुढे चार दिवस संबंध आला तर चालते (९ दिवसांपर्यंत). २१ व्या दिवसापासून पुढे पाळी येईपर्यंत जरी शारीरिक संबंध झाले, तरी गर्भधारणा होत नाही. परंतु ही उपाययोजना ज्याची पाळी अगदी नियमित आहे अशांमध्येच उपयोगात येऊ शकते. अनियमित पाळी असणाऱ्यांमध्ये बीजनिर्मिती अनियमित किंवा कधीही होऊ शकते व गर्भधारणा होऊ शकते. म्हणून ही पद्धत जास्त प्रमाणात अवलंबली किंवा वापरली जात नाही.

**३) हार्मोन्सचे इंजेक्शन :** Medroxy Proaesteron cetate या हार्मोन्सपासून बनलेले इंजेक्शन दर तीन महिन्यांतून एकदा घ्यावे. स्तनपानाच्या काळातदेखील हे इंजेक्शन वापरू शकतो. स्तनपानावर याचा दुष्परिणाम होत नाही. फक्त याने पाळी अनियमित होते. कधी कधी काही रुग्णांमध्ये अंगावरून न जाणे, दोन महिन्यांनी पाळी येणे अशी लक्षणे दिसतात. बीजनिर्मिती होत नसल्यामुळे ही लक्षणे दिसतात; परंतु ही लक्षणे तात्पुरती असतात. इंजेक्शन बंद केल्यानंतर परत नियमितपणे पाळी येण्यास सुरुवात होते. पहिले इंजेक्शन पाळीच्या पाचव्या दिवशी घ्यावे.

(क्रमश:)

**– डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



चांगले विचार मनात फारवेळा टिकत नाहीत म्हणून ते मनात येताच कृति करा.

## दिनविशेष १७ मे२०२४

* १७४९: देवीची लस शोधून काढणारे संशोधक व डॉक्टर एडवर्ड जेन्नर यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८२३)

*१८६५: मुसलमानी काळापासून ब्रिटिश अमदानीपर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास लिहीणारे इतिहासकार रियासतकार गोविंद सखाराम सरदेसाई यांचा जन्म. (मृत्यू: २९ नोव्हेंबर १९५९)

*१८६८: डॉज मोटर कंपनी चे संस्थापक होरॅस डॉज यांचा जन्म. (मृत्यू: १० डिसेंबर १९२०)

*१९३४: ऍपल इन्क कंपनी चे सहसंस्थापक रॉनाल्ड वेन यांचा जन्म.

*१९५१: गझल गायक पंकज उदास यांचा जन्म.

*१९६६: सद्दाम हुसेन यांचा मुलगा कुसय हुसेन यांचा जन्म. (मृत्यू: २२ जुलै २००३)

*१९७९: अभिनेत्री मुक्ता बर्वे यांचा जन्म.

१७ मे मृत्यू

*१८८६: डीयेर एंड कंपनीची स्थापक जॉन डीयेर यांचे निधन. (जन्म: ७ फेब्रुवारी १८०४)

*१९७२: शिल्पकार रघुनाथ कृष्ण फडके यांचे निधन.

*१९९६: कसोटी क्रिकेटपटू रुसी शेरियर मोदी यांचे निधन. (जन्म: ११ नोव्हेंबर १९२४)

*२०१२: अमेरिकन गायिका डोना समर यांचे निधन. (जन्म: ३१ डिसेंबर १९४८)

*२०१४: द लीला पॅलेस, हॉटेल्स अँड रिसॉर्ट्स चे स्थापक सी. पी. कृष्णन नायर यांचे निधन. (जन्म: ९ फेब्रुवारी १९२२)

## विनोद



**आईः** आज गप्प गप्प का?

**मुलगाः** उद्या शाळेत पालक शिक्षक संघाची लहानशी सभा आहे.

**आईः** छोटीस सभा असेल तर आम्ही नाही येणार, चालेल?

**मुलगाः** नाही. ही सभा फक्त बाबा, मी आणि मुख्याध्यापकांची होणार आहे.

## टिप्स

### सुंदर टॉनिक

नाचणीची आंबील उन्हाळ्यात करावी म्हणजे उन्हाळा बाधत नाही. एक किलो नाचणी आणून वाळवून बारिक दळून आणावी, पीठ चाळून ठेवावे. रात्री एक चमचा पिठ पाण्यात कालवून ठेवावे सकाळी चार वाट्या पाणी उकळून यात पिठ शिजवावे. त्यात मिरे, जिरे, पुड घालून गॅस बंद करावा. गार झाली म्हणजे आंबील पाक घालून फ्रिजमध्ये घालावी. उन्हाच्यावेळी पिण्यात द्यावी. आपल्याला आवडत असेल तर लसून, आले घालावे. नुसती शिजवून गार झाल्यावर मुलांना दुध, साखर घालून द्यावी हे फारच सुंदर टॉनिक आहे.

## आरोग्य

### अजिर्ण

☆ भूक न लागणे, अपचन होणे, आंबट ढेकरा येणे यावर उपाय म्हणून अर्धा ग्लास पाण्यात एक लिंबू पिळून साखर मिसळून नेहमी प्यावे. एक चमचा आल्याच रस, लिंबू, पादेलोण (सेंधा मीठ) एक ग्लास पाण्यात मिसळून घ्यावे. अननसाच्या फोडीवर मीठ व काळे मीठ टाकून खाल्याने अजीर्ण दूर होते. पपई खाल्याने पण अजीर्णामध्ये आराम येतो.

☆ एक चमचा कांद्याचा रस दोन- दोन तासाने घेतल्यास अजीर्ण बरे होते. लाल कांद्यावर लिंबू पिळून जेवताना खाल्यास अजीर्ण दूर होते. लहान मुलांस अजीर्ण झाल्यास पाच थेंब कांद्याचा रस दिल्यास आराम येतो.

## रुचिदा



### पापड रोल

**साहित्यः** ७-८ उडदाचे पापड, २ उकडलेले बटाटे, १ कांदा, १ गाजर, २ हिरव्या मिरच्या, १ लहानसा आल्याचा तुकडा, कोथिंबीर, मीठ, पाच चमचा चाट मसाला, पाव चमचा साखर, २ चमचे कॉर्नफ्लोअर.

**कृतीः** उकडलेले बटाटे गरम असतानाच साले काढून किसून घ्यावे. कांदा व गाजर किसून घ्यावे. मिरच्या व आले बारीक चिरावे. कांदा व गाजर किसून घ्यावे. मिरच्या व आले बारीक चिरलेला कांदा. हाताच्या तळव्यात धरुन पाणी काढून टाकावे.

गाजराचा कीस हाताने दाबून पाणी काढून ढाकावे. नंतर सारणासाठी सांगितलेले सर्व एकत्र करावे. छान गोळा झाला पाहिजे. पापडाला पाण्याचा हात फिरवा. त्यावर एका कडेला सारण ठेवून गुंडाळी करा. कडा बंद करण्यासाठी मैद्याची पेस्ट लावा. आयत्यावेळी तळा. सुरीने तिरके कापून २ तुकडे करुन वाढा.

## शब्दरंजन

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ■ | ४ | ५ | ६ | | | ■ | ७ | ८ |
| ९ | | | ■ | १० | | | | ■ | ■ | ११ | | |
| १२ | | | १३ | | | ■ | | ■ | १४ | ■ | | ■ |
| १५ | | | | | ■ | १६ | | | | ■ | | ■ |
| ■ | | ■ | | ■ | १७ | | | ■ | १८ | | ■ | १९ |
| २० | ■ | २१ | | २२ | ■ | ■ | २३ | २४ | ■ | ■ | २५ | |
| २६ | २७ | ■ | २८ | | २९ | | ■ | | ■ | ३० | ■ | |
| ३१ | | ■ | | ■ | | ■ | ३२ | ■ | ३३ | | | |
| ३४ | | ■ | ३५ | ३६ | | ३७ | | ■ | ३८ | | ■ | ■ |
| ■ | ३९ | | | | ■ | | ■ | ४० | ■ | | ■ | ४१ |
| ४२ | | ■ | | ■ | ४३ | | | | ■ | ■ | ४४ | |
| | ■ | ■ | ■ | ४५ | ■ | | ■ | | ■ | ४६ | | |
| ४७ | | | | | | ■ | ४८ | | | | | ■ |

### आडवे संकेत

१) गडाचा मुख्य शिपाई
४) स्व. मोरारजी देसाई यांच्या पत्नीचे नाव
७) तिन वेळा
९) जागत राहणे, निद्रा न घेणे
१०) प्रत्येक महिन्याला
११) येथील लेणी प्रसिद्ध आहे.
१२) अमिताभ व स्मिता पाटील यांचा एक चित्रपट.
१५) मोठ्या शहराचा प्रथम नागरिक
१६) मंगळवारची चतुर्थी
१७) विपुल, भरपूर
१८) बूड, खालचा भाग
२१) गवगवा, बोभाटा
२३) तांबडी माती
२५) इंडियन
२६) रंगत, मजा
२८) मास असलेले
३१) पकड
३३) मोठ्या संख्येतून लहान संख्या कमी करणे
३४) रजनी ३५) विनोदी
३८) लहान पेटी, करंडा
३९) आदर सत्कार
४२) दानी, दानशूर
४३) श्रीकृष्णाचा आतेभाऊ
४४) तुकाराम महाराजांकरिता एक संबोधन
४६) भुलविणारा
४७) गुढीपाडवा
४८) कोरडा, शुष्क, बेअक्कल

### उभे संकेत

१) करिवदन
२) हलणे
३) मला तुमची ही नेहमी आवडणार नाही
४) जहर, विष
५) पक्के बस्तान
६) पाणी काढण्याचे एक साधन ७) डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे जन्मगाव
८) द्विदल धान्य
१०) अडत्या, मध्यस्त
१३) जुलमाने दुसऱ्याकडून काढलेले द्रव्य येते तसे लवकर नाहिसे होते
१४) भविष्य १६) शरीर, शाखा, भाग १९) व्यभिचार
२०) सिद्धार्थची पत्नी
२२) स्वाद, चव
२४) पाहता लोचणी सुख झाले हो साजनी
२७) भारतीयांची आई
२९) नुपर, कमीपणा
३०) शिवरायांची आई
३२) धनुष्य ३३) एक वृक्ष
३६) हृदय ३७) मोठ्या मनाचा, दानी
४०) कोकणातील एक शहर
४१) निर्णयपत्र ४२) राक्षस
४४) आपतकाळ
४५) हादरा, धक्का
४६) फुटाणा, सोला

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तों | डा | ची | वा | फ | द | व | ड | णे | ■ | शा | र | दा |
| ड | ■ | ■ | त | ■ | ■ | र्णा | ■ | ■ | व | न | ■ | म |
| आं | ग | झा | ड | णे | ■ | श्र | म | दा | न | ■ | ■ | चुं |
| ब | ■ | व | ■ | ■ | स | म | ज | दा | री | ■ | बा | ब |
| ट | व | ळी | ■ | ■ | बं | ध | ■ | ■ | ■ | आ | व | क |
| क | च | ■ | क | र्म | ध | र्म | सं | यो | ग | ■ | न्न | ■ |
| र | न | ■ | र | ■ | ■ | ■ | घ | ■ | ण | ■ | ■ | पा |
| णे | ■ | ग | ज | ब | ज | णे | ■ | लो | क | सं | गी | त |
| ■ | वा | व | ■ | र | मा | ■ | ■ | ■ | ■ | चा | त | क |
| ज | ळा | त | रा | हू | न | मा | शां | शी | वै | र | ■ | ■ |
| ळ | ■ | का | ■ | कु | त | र्क | ■ | त | ■ | बं | ध | न |
| क | व | ळी | ■ | म | ■ | ■ | ■ | क | मो | दी | नी | ■ |
| ट | र | ■ | ■ | ■ | ■ | ■ | व | र | ळी | ■ | ■ | ■ |





१) रॅमन मॅगसेसे पारितोषिकाचे पहिले भारतीय मानकरी कोण?
अ)रविंद्रनाथ टागोर ब)आचार्य विनोबा भावे
क)तेनसिंग नोर्को ड)सुरेंद्रनाथ बॅनजी

२) भारतीय राष्ट्रीय सभेच्या पहिला महिला अध्यक्षा कोण?
अ)इंदिरा गांधी ब)सी.बी. मुथाम्मा क)सरोजिनी नायडू ड)ॲनी बेझंट

३) एव्हरेस्टवर सर्वप्रथम पाऊल ठेवणारा खालीलपैकी कोण?
अ)तेनसिंग नोर्के ब)मिहिर सेन
क)निल आर्मस्टाँग ड)सुनिता विल्यम

४) इंग्लीश खाडी पोहुन जाणारा पहिला भारतीय कोण?
अ)अर्जुन वाजपेयी ब)डॉ. अमर्त्यकुमार सेन
क)मिहिर सेन ड) राकेश शर्मा

५) पदावर असताना निधन पावलेले पहिले राष्ट्रपती कोण?
अ)डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ब)गॅनी झेलसिंह
क)डॉ. झाकीर हुसेन ड)डॉ. राजेंद्र प्रसाद

६) खालीलपैकी कोणत्या वर्षी लोकपाल विधेयक संसदेत प्रथम सादर करण्यात आले?
अ)१९६२ ब)१९६४ क)१९६६ ड)१९७०

७) राज्य धोरणांच्या मार्गदर्शक तत्त्वापैकी आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा प्रस्थापित करण्याशी संबंधीत तत्त्व खालीलपैकी कोणत्या कलमात दिलेले आहे?
अ)कलम ५१ ब)कलम ६२ क)कलम ४३ ड)कलम ८४

८) खालीलपैकी कोणता कर राज्य सरकार वसूल करु शकत नाही?
अ)जमीन व इमारतीवरील कर ब)विक्रीकर
क)शेतकी उत्पादनावरील कर ड)कार्पोरेशन टॅक्स

९) राज्यपाल म्हणून नेमणूक होण्यासाठी कमीत कमी किती वर्ष वय पूर्ण असावे? अ)२५ ब)१८ क)३५ ड)४२

१०) विधानसभेच्या प्रत्येक सभासदास पद ग्रहण करण्यापूर्वी कोणासमोर शपथ ग्रहन करावी लागते?
अ)मुख्य न्यायाधीश ब)मुख्यमंत्री
क)राज्यपाल ड)सर्वोच्च न्यायाधीश

११) गीरचे अभयारण्य (सिंह) हे खालीलपैकी कोणत्या राज्यात आहे?
अ)हरियाणा ब)गुजरात क)आसाम ड)कर्नाटक

१२) भारतात सिमेंटचा पहिला कारखाना इ.स. १९०४ मध्ये खालीलपैकी कोठे सुरु झाला मात्र तो लवकरच बंद सुद्धा पडला?
अ)सुरत ब)चेन्नई क)हैदराबाद ड)चंद्रपूर

१३) कर्नाटक राज्यातील केमानगुंडी लोह-खनिज क्षेत्र बाब बुदान टेकड्यांमध्ये पसरलेले आहे येथून खालीलपैकी कोणत्या- पोलाद प्रकल्प लोह- खनिज पुरविले जाते?
अ)कोट्टागुडम ब)भद्रावती क)विशाखापट्टणम ड)रुरकेला

१४) चवथ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात विशाखापट्टणम येथे लोह-पोलाद प्रकल्पाची उभारणी केली गेली. समुद्र सानिध्य लाभलेला हा भारताचा हा पहिलाच पोलाद प्रकल्प भारताच्या पूर्व किनाऱ्यावर कोणत्या राज्यात आहे?
अ)केरळ ब)आंध्रप्रदेश क)तामिळनाडू ड)कर्नाटक

१५) महाबळेश्वर सहयांद्री पर्वतावरील थंड हवेचे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे? अ)पुणे ब)सातारा क)रायगड ड)ठाणे

१६) मेळघाट या डोंगररांगामध्ये खालीलपैकी कोणती आदिवासी जमात जास्त प्रमाणात आढळते?
अ)गोंड ब)भिल्ल क)कोरकू ड)वार्ली

१७) तेरे खोल ही कोकणातील अगदी दक्षिणेस असलेली नदी आहे तर कोकणातीलच अगदी उत्तरेस असलेली नदी खालीलपैकी कोणती?
अ)दमणगंगा ब)काळ क)सावित्री ड)वाशिष्ठी

१८) महाराष्ट्राची उपराजधानी नागपूर हे खालीलपैकी कोणत्या लोहमार्गावरील महत्त्वाचे जंशन आहे?
अ)मुंबई-दिल्ली ब)मुंबई-कोलकता
क)मुंबई-मंगळुर ड)मुंबई-बंगलोर

**उत्तरः (१-अ), (२-ड), (३-अ), (४-क), (५-क), (६-क), (७-अ), (८-ड), (९-क), (१०-क),(११-ब), (१२-ब), (१३-ब), (१४-ब), (१५-ब), (१६-क), (१७-अ), (१८-ब)**

## फिल्मीरंजन

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | ■ | ■ | ■ | २ | ■ | ■ | ३ | ■ | ४ | ■ | ■ |
| | ■ | ■ | ५ | | | ■ | ६ | | | | | ■ |
| | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | ७ |
| ८ | | ९ | | १० | | | | | ■ | ■ | ■ | |
| ■ | ■ | | ■ | | ■ | ■ | | ■ | ■ | ११ | | |
| १२ | | | ■ | १३ | | | | १४ | | | ■ | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | | ■ | १५ | | १६ |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | |
| ■ | ■ | | ■ | १७ | | | १८ | | | १९ | ■ | |
| २० | | | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | | ■ | |
| | ■ | | ■ | ■ | २१ | | | ■ | ■ | | ■ | |
| | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | २२ | ■ | | ■ | |
| ■ | ■ | ■ | २३ | | | ■ | २४ | | | | ■ | ■ |



### आडवे संकेत

१) इस नामसे दो फिल्में बनी पहली में सलमान खान और दुसरी में संजय दत्त थे.
५) तुझे मेरी (फिल्म)
६) सन् १९८९ में निर्देशक बापू की इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और माधूरी दीक्षीत थे.
८) सन् २००२ में बनी इस फिल्म में शाहरुख खान, माधूरी दीक्षीत और सलमान खान थे.
११) सन् १९९४ में सिकंदर भारती निर्देशित इस फिल्म में अक्षय कुमार और मधू थे.
१२) है मुकाबला (फिल्म)
१३) सन् १९८२ में बनी इस फिल्म में जितेंद्र का डबल रोल था.
१५) इंडीया (फिल्म)
१७) सन् १९८६ में भारती राजा निर्देशित इस फिल्म में सनी देओल और पुनम ढिल्लो थे.
२०) नाम ओ (फिल्म)
२१) सन् १९८६ में मोहन सहगल निर्देशित इस फिल्म में धर्मेंद्र, जीनत अमान और जितेंद्र थे.
२३) सन् १९९७ में निर्देशक राज कंवर की इस फिल्म में अनिल कपूर, श्रीदेवी और उर्मिला मातोंडकर थे.
२४) इस नामसे दो फिल्में बनी पहली में दिलीप कुमार और दुसरी में ऋषी कपूर थे.

### उभे संकेत

१) सन् १९९९ में अब्बास मस्तान निर्देशित इस फिल्म में शाहरुख खान और ट्विंकल खन्ना थे.
२) तुमपे मरते है (फिल्म)
३) तेरे (फिल्म)
४) सन् १९९४ में बनी इस फिल्म में संजय दत्त, रवीना टंडन, अतूल अग्निहोत्री और करिश्मा कपूर थे.
६) सन् १९७४ में के.एस. प्रकाशराव की इस फिल्म में राजेश खन्ना और हेमा मालिनी थे.
७) बादशाह (फिल्म)
९) सन् २००२ में बनी इस फिल्म में नकुल कपूर, किम शर्मा और आरती छाब्रीया थे.
१०) अफलातून मै हूं अफलातून.... यह गाना इस गायक ने गाया है.
११) समझा करो (फिल्म)
१२) सन् १९९३ में बनी इस फिल्म में धर्मेंद्र, अनिल कपूर और मिनाक्षी शेषांद्री थे.
१४) आप हमारे होते (फिल्म)
१६) सन् १९८१ में बनी फिल्म एक दुजे के लिए की नायीका.
१८) देव आनंद और जीनत अमान अभिनीत फिल्म.
१९) सन् १९८२ में बनी इस फिल्म में मिथून चक्रवर्ती और किम थे.
२०) दिल के अरमा आसूओं में बह गये..... यह गाना इस फिल्म का है.
२१) हाथ की (फिल्म)
२२) मिर्झा (नायीका)

**उत्तर उद्याच्या अंकात**

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ते | रे | ना | म | ■ | ■ | अ | ■ | म | नी | षा | ■ | क |
| रा | व | ■ | ■ | वि | नो | द | ख | न्ना | ■ | ■ | ■ | री |
| जा | ती | हूं | ■ | शा | ■ | ना | ■ | डे | ज | ■ | अ | ब |
| दु | ■ | ■ | ■ | ल | ■ | न | ■ | ■ | मा | ली | नी | ■ |
| च | ल | मे | रे | भा | ई | ■ | ■ | ■ | ने | ■ | ल | ■ |
| ल | ■ | ज | ■ | र | ■ | ■ | कि | सी | से | ■ | क | ■ |
| ग | द | र | ■ | द्वा | ■ | ■ | शो | ■ | ■ | स | पु | त |
| या | ■ | सा | ■ | ज | या | ■ | र | ■ | अ | ■ | र | ■ |
| ■ | अ | ब | के | ■ | रा | ज | कु | मा | र | ■ | ■ | त |
| औ | र | ■ | त | रा | ना | ■ | मा | ■ | मा | ध | व | न |
| ■ | मा | ख | न | ■ | ■ | प्या | र | ■ | न | ■ | ■ | ब |
| ■ | न | ■ | ■ | उ | ■ | ■ | ■ | ■ | ■ | ज | ल्ला | द |
| ■ | ■ | अ | मि | षा | प | टे | ल | ■ | ■ | या | ■ | न |

# क्षणोक्षणी निराकार प्रभुच्या प्रति समर्पित होऊन जीवन जगावे

**सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज**

नगर – जेव्हा आपण क्षणोक्षणी या निराकार प्रभुच्या प्रति पूर्ण समर्पित होऊन आपले जीवन जगतो तेव्हाच खऱ्या अर्थाने आपले जीवन मानवतेच्या कल्याणार्थ समर्पित होऊन जाते. असेच प्रेमा-भक्तीने परिपूर्ण जीवन बाबा हरदेव सिंहजी यांनी स्वत: जगून आम्हाला दाखवले, असे आशिर्वचन सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी समालखा येथे बाबा हरदेव सिंहजी महाराज यांच्या स्मृतित आयोजित 'समर्पण दिवस'च्या मुख्य सत्संग कार्यक्रमात व्यक्त केले. त्यांच्या समवेत स्टेजवर निरंकारी राजपिता रमितजी विराजमान होते.



संत निरंकारी मंडळाच्यावतीने बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित 'समर्पण दिवस' समालखा येथील कार्यक्रमात उपस्थित विशाल जनसमुदाय व भाविकांना मार्गदर्शन करतांना सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी.

## निरंकारी मंडळातर्फे बाबा हरदेव सिंहजी यांना समर्पित 'समर्पण दिवस' साजरा

कार्यक्रमात बाबाजींच्या प्रेम, करुणा, दया व समर्पण आदि दिव्य गुणांचे वर्णन मिशनच्या अनेक वक्त्यांनी गीत, भजन, कवितांच्या माध्यमातून व्यक्त करुन त्यांना हृदयपुर्वक श्रद्धा सुमने अर्पित करीत त्यांच्या अनुपम जीवनाला नमन केले. 'समर्पण दिवस'चे कार्यक्रम देशभर तसेच विदेशात ही साजरा करण्यात आले.

निरंकारी मंडळाच्या नगर शाखेच्या वतीने सुद्धा मिस्कीन रोड, नगर येथील संत निरंकारी सत्संग भवन येथे सायं. ७ ते ९ या वेळेत 'समर्पण दिवस' निमित्त सत्संग कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. मुख्य मंचावर बहन आरती चावला (श्रीरामपूर) विराजमान होत्या. त्यांनी बाबा हरदेव सिंहजींच्या परोपकारी जीवनाची, त्यांच्या शिकवणुकीविषयी भाविकांना अवगत केले. याप्रसंगी नगर शहर व परिसरातील भाविक उपस्थित होते. असेच सत्संग कार्यक्रम जिल्हाभर आयोजित करण्यात आले होते.

सद्गुरु माताजी पुढे म्हणाल्या, बाबा हरदेव सिंहजींनी स्वत: प्रेमाचे मुर्तीमंत रुप बनून नि:स्वार्थ भावनेने जीवन जगण्याची कला शिकविली. शेवटी माताजींनी सांगितले की, जेव्हा अपण परमात्म्यावर खरे प्रेम करु लागतो, तेव्हा मायावी संसरातील लाभ-हानीचा प्रभाव आमच्यावर पडत नाही, त्या परिस्थितीत प्रभु प्रेम आणि प्रभु इच्छा ही सर्वोपरी बनून जाते.

नि:संदेह प्रेमाचे मुर्तिमंत रुप असलेले बाबा हरदेव सिंहजी यांची करुणामय अनुपम छबी प्रत्येक श्रद्धालू भक्तांच्या हृदयात अमिट छाप बनून राहिली असून, त्यांच्या अनंत उपकारांबद्दल निरंकारी जगतातील प्रत्येक भक्त सदैव ही ऋणी राहील.


# नगरच्या हार्मनी इंटरनॅशनल स्कूलचा सीबीएसई १०वीचा निकाल शंभर टक्के



सुयश आडसुरे



उत्कर्ष ठुबे



अभिनव सोनवणे

नगर – हार्मनी इंटरनॅशनल स्कूल सीबीएसईचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला. दहावीच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करत शाळेची मान अभिमानाने उंचावली आहे.

चि.सुयश ज्ञानदेव आडसुरे ९५.४० याने गुण प्राप्त करत प्रथम क्रमांक पटकावला. चि.उत्कर्ष बाळासाहेब ठुबे ९२.२० तर अभिनव पंकज सोनवणे ९०.८० गुण मिळवत अनुक्रमे द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केले.

अशोक बेरड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत हार्मनी इंटरनॅशनल स्कूल हे एक शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट सेवा प्रदान करत असल्याचे प्रतिपादन केले. विद्यार्थ्यांचे परिश्रम आणि पालकांचे सहकार्य कौतुकास्पद असल्याचे सांगितले. सर्वोत्कृष्ट अध्ययन अध्यापनाचे फलित असल्याचे सांगत सर्वांचे अभिनंदन केले. संस्थेचे संस्थाचालक कृष्णन पोट्टी, नंदिता भट, राधा पांडे यांनी गुणवंत विद्यार्थी आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

# आनंदऋषीजी नेत्रालयात पहिली बुबुळ प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी

**तरूण नेत्ररुग्णाला मिळाली नवीन दृष्टी**

नगर – जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी नेत्रालयात पहिली कॉर्निया (बुबुळ) प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली आहे. नेत्रालयाचे वैद्यकीय संचालक डॉ.अशोक महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.नलिनी महेंद्रुकर यांनी ही शस्त्रक्रिया केली. या शस्त्रक्रियेमुळे रूग्णाला दृष्टी परत मिळाली असून तो सामान्य जीवन जगू शकतो. ही शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत मोफत करण्यात आली, अशी माहिती प्रशासकीय अधिकारी आनंद छाजेड यांनी दिली.



आनंदऋषीजी नेत्रालयात पहिली कार्निया (बुबळ) प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडणाऱ्या डॉ. नलिनी महेंदुकर. समवेत नेत्ररुग्ण सौरभ विजय कानकेटे.

संगमनेर येथील सौरभ विजय कानकेटे या तरूणाला दोन तीन वर्षांपासून डोळ्यांना त्रास होत होता. नातेवाईकांच्या सल्ल्याने तो नगरला आनंदऋषीजी नेत्रालयात आला. तपासणी केली असताना बुबुळ प्रत्यारोपण करणे आवश्यक वाटल्याने डॉक्टरांनी रूग्णाला त्याची कल्पना दिली. सर्व प्रक्रिया लवकर पूर्ण करून ही नेत्र शस्त्रक्रिया करण्यात आली. नेत्रालयातील अत्याधुनिक जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान व डॉक्टरांचे कौशल्य यामुळे नेत्रालयातील ही पहिलीच बुबुळ प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. रूग्णाला दृष्टी परत मिळाली आहे. आनंदऋषीजी नेत्रालयातील तत्पर आणि सर्वोच्च दर्जाची उपचार सेवा यामुळे आपल्याला नवी दृष्टी मिळाल्याची भावना रूग्णाने व्यक्त केली.

आनंदऋषीजी नेत्रालय अत्याधुनिक नेत्रोपचारांसाठी ओळखले जाते. व्हिजन सेंटर, नेत्र शिबिरांच्या माध्यमातून नेत्रालयाने नगरसह बीड, धाराशिव जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रूग्णांना उत्कृष्ट सेवा दिली आहे. आतापर्यंत नेत्रालयात ७६ हजार पेक्षा अधिक यशस्वी नेत्रशस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. १९ नेत्रतज्ज्ञांची टिम रूग्णसेवेसाठी कार्यरत आहे. नेत्रालयातील ओपीडीमध्ये दररोज सुमारे ५०० रूग्णांची तपासणी करण्यात येते. तर २५ व्हिजन सेंटरमध्ये दररोज सुमारे ६०० रूग्णांची तपासणी करण्यात येते. वर्षभर शिबिरांचे आयोजन करून अधिकाधिक रूग्णांना उच्च दर्जाच्या उपचार सुविधांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न असतो. कॉर्निया प्रत्यारोपण यशस्वी शस्त्रक्रियेमुळे नेत्रालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

# नगरमध्ये १८ मे रोजी मिलिंद शिंदेंच्या '२१७ पद्मिनी धाम' चा नाट्यप्रयोग

नगर – अहमदनगर जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा सिने-नाट्य अभिनेते मिलिंद शिंदे यांची प्रमुख भूमिका असलेल्या '२१७ पद्मिनी धाम' या व्यावसायिक नाटकाचा प्रयोग १८ मे रोजी रात्री ९ वाजता सावेडीतील माऊली संकुल नाट्यगृहात होणार आहे.




सुमती क्रिएशन्स, नवनीत प्रकाशित, दुर्वा पूर्वा क्रेडिट सोसायटी व फलाट निर्मित लेखक रत्नाकर मतकरी यांच्या 'कामगिरी' या कथेवर आधारित '२१७ पद्मिनी धाम' भास की आभास : चे नाट्यरूपांतर नचिकेत दांडेकर व संकेत पाटील यांनी केले असून संकेत पाटील यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. या नाटकास अनिकेत कदम यांची गीते, शुभम ढेकळे यांचे संगीत, संदेश बेंद्रे यांचे नेपथ्य, शितल तळपदे यांची प्रकाश योजना, संदेश रणदिवे यांचे नृत्य दिग्दर्शन, सिद्धी चिखलकर यांची वेशभूषा लाभली आहे. करण भोगले, देवेंद्र नाईक व दिप्ती ताठेले हे नाटकाचे निर्माते आहेत.

या नाटकात सुनिल तांबट, अमृता पवार, सचिन नवरे, अनिकेत कदम, सुबोध वाळणकर आणि मिलिंद शिंदे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. रत्नाकर मतकरी यांच्या साहित्याचा एक विशिष्ट वाचक वर्ग महाराष्ट्रात आहे. त्यातही त्यांच्या कथांचाही एक वेगळा वाचक वर्ग आहे. त्यांच्या कथेवर आधारित हे नाटक असल्यामुळे या नाटकाच्या शिर्षकावरून हे एक रहस्यमय नाटक असावे असा कयास प्रेक्षकांनी बांधला आहे. अष्टपैलू अभिनेते मिलिंद शिंदे यांची यात प्रमुख भूमिका आहे. त्यामुळे हे नाटक नेमके कसे आहे ? नाटकाचा विषय काय आहे? आणि त्यात मिलिंद शिंदे यांची नेमकी काय भूमिका असेल? असे अनेक प्रश्न प्रेक्षकांच्या मनात दबा धरून बसलेले आहेत. त्यांची उत्तरे शनिवारी हा प्रयोग पाहिल्या नंतरच मिळणार आहेत.

चित्रपट, मालिका, वेब सिरीज अशा अनेक माध्यमांमध्ये व्यस्त असलेले अभिनेते मिलिंद शिंदे यांनी बऱ्याच वर्षाच्या प्रतीक्षेनंतर रंगभूमीवर आले आहेत. यापूर्वी त्यांची भूमिका असलेली झुलवा, ती फुलराणी, कथा अरुणाची, लग्न कल्लोळ, अलबेल, अबीर गुलाल ही सगळी नाटके गाजली आहेत. लेखक, दिग्दर्शक, अभिनेता, व्याख्याता, अशी चौफेर कामगिरी असलेले अभिनेते मिलिंद शिंदे आपली प्रत्येक भूमिका वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण कशी ठरेल याकडे त्यांचा नेहमी कल असतो. त्यासाठी ते लेखन, वाचन, निरीक्षण आणि विविध लकबीचा योग्य वापर करण्यात त्यांचा विशेष हातखंडा आहे. हे त्यांनी नाटक, मालिका, चित्रपट, वेब सिरीज मधून केलेल्या विविध भूमिकांद्वारे वेळोवेळी सिद्ध केले आहे.

घात, सरकती, मदार, सुधागड ००७, कठपुतली कॉलनी हे यांचे आगामी चित्रपट असून मदार या चित्रपटाचे निर्माते व अभिनेते अशी दुहेरी जबाबदारी त्यांनी सांभाळली आहे. कठपुतली कॉलनी या चित्रपटाचे कथा, पटकथा, संवाद, अभिनय अशी जबाबदारी त्यांनी सांभाळली आहे. लेखन, दिग्दर्शन, अभिनय, निर्मिती, व्याख्यान अशा सर्व जबाबदाऱ्यामध्ये व्यस्त असताना सुद्धा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात त्यांचे पी एच डी चे संशोधन सध्या सुरू आहे. त्याच बरोबर त्यांचा एक नवीन कथा संग्रह देखील प्रकाशनाच्या वाटेवर आहे.

२१७ पद्मिनी धाम या नाटकाबरोबरच 'गाथा नवनाथांची' या मालिकेत ते गुरु आई या लक्षवेधी भूमिकेद्वारे प्रेक्षकांसमोर आले आहेत. या भूमिकेसाठी हिरवी साडी, डोक्यावर पदर, कपाळावर बंदा, रूपया एवढं कुंकू, नाकात नथ, गळ्यात मंगळसूत्र आणि भेदक नजर यांचा त्यांनी बेमालूमपणे वापर केला आहे.

यापूर्वी त्यांची भूमिका असलेले झुलवा व अबीर गुलाल या दोन्ही व्यावसायिक नाटकांचे प्रयोग अहमदनगर मध्ये झाले आहेत. मिलिंद शिंदे यांची प्रमुख भूमिका असलेला परंपरा हा चित्रपट नुकताच प्रदर्शित झाला असून अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये या चित्रपटाने अनेक पारितोषिके मिळवली आहेत. सध्या सातारा येथे त्यांच्या मालिकेचे चित्रीकरण सुरू आहे.

# पुतळा जाळल्याच्या गुन्ह्यातून स्व.अनिल राठोड यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता

नगर – एमआयएम पक्षाचे माजी आमदार वारिस पठाण यांनी कर्नाटक राज्यामध्ये हिंदू धर्मीयांच्या भावना दुखावल्या जातील असे वक्तव्य केल्याने नगर शहर शिवसेना पक्षाच्या वतीने निषेध म्हणून चितळे रोड या ठिकाणी आमदार वारिस पठाण यांचा प्रतिकात्मक पुतळा जाळल्या बाबत तोफखाना पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्यातून न्यायालयाने माजी आमदार स्व. अनिल राठोड यांच्यासह शिवसेना पदाधिकाऱ्यांची निर्दोष मुक्तता केली आहे.

माजी आमदार स्व. अनिल राठोड यांच्यासह दिलीप सातपुते, मदन आढाव, दत्तात्रय कावरे, योगीराज गाडे आणि संग्राम कोतकर यांच्याविरुद्ध हा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याची चौकशी होऊन तोफखाना पोलिसांनी आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र नगर येथील न्यायालयात दाखल केलेले होते. दरम्यानच्या काळात माजी आमदार अनिल राठोड यांचे कोरोनाने निधन झाल्यानंतर उर्वरित आरोपींविरुद्ध खटला चालवण्यात आला.

सदर खटल्यामध्ये सरकार पक्षाला आरोपींविरुद्ध कोणताही सबळ पुरावा सिद्ध न करता आल्याने ८ वे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती ए.ए.शिरवळकर यांनी आरोपींना बुधवारी (दि.१५) सदर खटल्यातून निर्दोष मुक्त केलेले आहे. सदर खटल्यामध्ये आरोपींतर्फे ॲड. समीर पटेल यांनी कामकाज पाहिले व त्यांना ॲड.सलमान जहागीरदार यांनी सहकार्य केले.



माळीवाडा येथील ब्राम्हण गल्लीतील शंकर सावली मठात शंकर महाराजांच्या समाधी सोहळ्यानिमित्त आयोजित हनुमान चालिसा पठण करताना शंकर भक्त व परिसरातील नागरिक.

# शंकर सावली मठात हनुमान चालीसा

नगर – नगरमधील माळीवाडा येथील ब्राह्मण गल्लीतील शंकर सावली मठात शंकर महाराजांच्या ७७ वा समाधी सोहळ्या निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये श्री रामभक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट प्रस्तुत हनुमान चालीसा व भजनसंध्या कार्यक्रम झाला.

मठासमोर आयोजलेल्या या सामुहिक हनुमान चालीसा पाठ झाली व भजनसंध्याने शंकर महाराजांच्या नामाने परिसर दुमदुमन गेला होता यावेळी हनुमान चालीसाच्या गायनाने कार्यक्रमात रंगला. तर भाविकांनी सामुदायिक पठणात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला व भजन संध्यात भाविक तल्लीन झाले होते. विविध देवतांची स्तुतीपर भजने झाली.

या कार्यक्रमास शंकर भक्त, परिसरातील भाविक तसेच विविध क्षेत्रातील कार्यकर्ते उपस्थित होते. हनुमान चालीसा कार्यक्रमानंतर सर्व भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले व फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली

४ दिवसीय या कार्यक्रमात सामुदायिक शंकर गिता पारायण सोहळा झाला. दुसऱ्या समाधी दिनी पालखी छबिना सोहळा होणार असून गुरुवारी संध्याकाळी महाप्रसाद म्हणून आगडगावची आमटी व भाकरचे जेवण ठेवण्यात आले आहे.

तरी सर्व भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन मठाच्या वतीने करण्यात आले आहे

# साईराज टेस्ट सीरिजचे विद्यार्थी 'सीबीएसई' परिक्षेमध्ये अव्वल

**अथर्व सानप ९५.६० टक्के गुण मिळवत ठरला टॉपर; अन्य ५ जणांचेही सुयश**

नगर – सलग चार वर्षांपासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षेत अव्वल निकाल देणार्या६ साईराज टेस्ट सिरीज चे विद्यार्थी या वर्षीही सीबीएसई परीक्षेतही अव्वल स्थानावर पोहचले आहेत. ६ विद्यार्थ्यांनी ८० पेक्षा जास्त गुण मिळविले असल्याची माहिती साईराज टेस्ट सिरीज चे संचालक प्रा.राजेश पवार यांनी दिली.



अथर्व सानप



आर्या करडे



आर्या काळे



निल वहाडणे



अभिजित शिंगाडे



निल दासवानी

सीबीएसई बोर्डाच्या १० वी च्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. यामध्ये साईराज टेस्ट सिरीजचा विद्यार्थी अथर्व सानप हा ९५.६० टक्के गुण मिळवत टॉपर आला आहे. आर्या करडे हिने ९५ टक्के, निल दासवानी याने ८७ टक्के, आर्या काळे हिने ८५ टक्के, निल वहाडने ८३ टक्के, अभिजित शिंगाडे याने ८० टक्के गुण मिळवून अव्वल यश संपादन केले आहे.

या सर्वांना साईराज टेस्ट सिरीज.चे संचालक प्रा.राजेश पवार, प्रा.अभिमन्यू वाघमारे, प्रा.जावेद सय्यद यांनी मार्गदर्शन केले.

सीबीएसई बोर्डाच्या निकालाप्रमाणेच साईराज टेस्ट सीरिज चे विद्यार्थी या वर्षीही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा परिषदेच्या निकालातही उज्वल यश संपादन करतील असा विश्वास प्रा.राजेश पवार यांनी व्यक्त केला आहे.



मंगल भक्त सेवा मंडळाच्यावतीने मंगल दत्त क्षेत्रात श्री शंकर महाराज समाधी सोहळा सोहळामध्ये शंकर गीता पारायण उत्साहात झाले. यामध्ये महिला सहभागी झाल्या होत्या.

# डॉ. पानसरे चेस्ट क्लिनिकतर्फे व्हेरिकोज व्हेन लेझर उपचार शिबीर

**पुणे येथील रक्तवाहिनी तज्ञ हेमंत चौधरी १८ व १९ मे रोजी नगरमध्ये**

नगर – नागरिकांमध्ये सध्याच्या धकाधकीच्या जीवनामध्ये व्हेरिकोज व्हेनचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळत आहे. सर्वसामान्य नागरिकांना उपचार मिळावेत यासाठी डॉ. पानसरे चेस्ट क्लिनिकच्या माध्यमातून नगर जिल्ह्यातील रुग्णांना आता नगर शहरात उपचार करून मिळणार आहे. यासाठी पुणे येथील रक्तवाहिनी स्पेशलिस्ट डॉक्टर हेमंत चौधरी यांचे



१८ व १९ मे रोजी डॉक्टर पानसरे चेस्ट क्लिनिक इथे हॉटेल ओबेराय मीरा मेडिकल शेजारील साईड येथे शिबिराचे आयोजन केले आहे. या शिबिराचे उद्घाटन पद्मश्री पोपटराव पवार, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, प्रा. संजय बाबर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. माहितीसाठी ८४८४९३५४५६ या नंबरची संपर्क साधावा असे आवाहन डॉ. सचिन पानसरे यांनी केले.

# दहावी बारावीच्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत आयकॉन स्कूलच्या विद्यार्थ्यांची कामगिरी

नगर – शरद मुथा एज्युकेशन ट्रस्ट संचालित आयकॉन पब्लिक स्कूलच्या दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. दहावीत आशय गांधी ९५.६ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम आला तर बारावी वाणिज्य शाखेत चार्वी कटारिया ९७.४ टक्के गुण मिळवून प्रथम आली. तिने बिझनेस स्टडीज विषयात १०० गुण मिळवण्याची कामगिरी केली. सर्वाधिक गुण मिळालेल्या पाच विषयांची मिळून टक्केवारी काढण्यात आली आहे.



आशय गांधी पियुश भाटी चार्वी कटारिया

आयकॉन पब्लिक स्कूलमधील दहावीला आशय गांधी (९५.६ टक्के), अभिराज कदम (९५.२), तेजस गोरे (९५), सई जोशी (९४.२), स्नेहा लांडगे (९४.२), अंशिका झावरे ( ९३.६), आरुष शहा (९३.४), ताहा शेख (९२.४), वाड्मय बोरकर (९१.८), युवराज मिसाळ (९१.६), सौख्या रहाणे (९१.२), इशिता बोरा (९१), रोशन गुगळे (९०.६), निर्भय सिंग (९०.६), निर्जरा कटारिया (९०.४), श्रेयस चेमटे (९०.२) यांनी उल्लेखनीय यश मिळवले.

दहावीत हिंदी विषयात तेजस गोरे, शरणित मखीजा यांनी प्रत्येकी ९८ गुण मिळवले. गणित विषयात तेजस गोरे, आरूष शहा यांनी ९९ गुण तर आशय गांधी याने ९८ गुण मिळवले. सामाजिक शास्त्र विषयात अभिराज कदम, अंशिका झावरे यांनी ९९ गुण तर सई जोशी, रोशन गुगळे, आशय गांधी यांनी ९८ गुण मिळवले.

इयत्ता बारावी विज्ञान शाखेत पियुष भाटी (८९.८ टक्के), तनिषा सय्यद (८९.२), मान्यता सिंग (८५.८), श्रुतिका परभणे (८५), वैष्णवी शर्मा (७९.२), तनुष कौशल (७८.२), वाणिज्य शाखेत चार्वी कटारिया (९७.४), अमर भोपटे (८९.४), व्ही. दर्श (८५.६) यांनी चांगले यश मिळवले.

प्राचार्या दीपिका नगरवाला म्हणाल्या की, बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरीची परंपरा शाळेने कायम राखली आहे. विद्यार्थ्यांची जिद्द आणि मेहनत सफल आली आहे. त्यांनी आपल्या कामगिरीने इतर विद्यार्थ्यांसाठी आदर्श निर्माण केला आहे. शिक्षकांचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांचे कौशल्य यातून सदर यश प्राप्त झाले आहे.

सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेच्या संरक्षक श्रीमती मंगला मुथा, अध्यक्ष अशोक मुथा, विश्वस्त अमित मुथा, निर्मल मुथा, विश्वस्त, संचालक (प्रशासन) कर्नल आर.सी. राणा, संचालक (शैक्षणिक) आराधना राणा, प्राचार्या दीपिका नगरवाला आदींसह शरद मुथा एज्युकेशन ट्रस्टच्या सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

